आपण मागितलेल्या दि.०९/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये माहितीचा तपशील :-

| मागितलेल्या माहितीचे स्वरुप | पुरविण्यात येणारी माहिती |
|---|---|
| १) विद्यार्थ्यांच्या Internship Completion Certificate वर सही करण्यासाठी कोण अधिकृत आहे प्राचार्य की संस्थाचालक याची तपशिलासहित माहिती द्यावी. | आपण मागणी केल्यानुसार विद्यापीठाचे दि.२१/०९/२०२० रोजीचे परिपत्रक क्र.०३/२०२० जा. क्र.मआविवि/विद्यार्थी कक्ष (शै.)/१९९६/२०२० अन्वये विद्यार्थ्यांच्या Internship Completion Certificate वर सही करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिष्ठाता अधिकृत आहे. सोबत सदर पत्राची छायांकित प्रत जोडलेली आहे. (सहपत्र क्र ०१ ते ०३) |
| २) जर संस्थाचालक विद्यार्थ्यांच्या Internship Completion Certificate वर सही करण्यासाठी अधिकृत नसल्यास ते कोणत्या अधिकाराखाली ते असे करीत आहेत याची तपशिलासहित माहिती द्यावी. | आपण मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याने देता येत नाही. |
| ३) आतापर्यन्त अशा किती विद्यार्थ्यांच्या Internship Completion Certificate संस्थाचालकांनी सहया केल्या आहेत तसेच त्यांच्याविरुध्द विद्यापीठ काय कार्यवाही करणार आहे याची तपशिलासहित माहिती द्यावी. | आपण मागणी केल्यानुसार विद्यापीठाचे दि.२१/०९/२०२० रोजीचे परिपत्रक क्र.०३/२०२० जा. क्र.मआविवि/विद्यार्थी कक्ष (शै.)/१९९६/२०२० अन्वये विद्यार्थ्यांच्या Internship Completion Certificate वर महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिष्ठाता यांची सही बंधनकारक आहे. |
| ४) मागील १५ वर्षापासून जवळपास सर्वच खाजगी आयुर्वेद महाविद्यालयात रुग्ण नसल्याने कुणीच विद्यार्थी Internship training करीत नाही त्याबदल्यात खाजगी संस्थाचालक जबर आर्थिक दंड आकारतात व स्वत:च्या सहीने प्रमाणपत्र देतात याची जाणकारी विद्यापीठास आहे का व असल्यास विद्यापीठ काय कार्यवाही करणार आहे तसेच नसल्यास सत्यशोधक चमू पाठवून पडताळणी करेल का याची तपशिलसहित माहिती द्यावी. | आपण मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) (झ) व (त्र) अन्वये देता येत नाही. तथापी, यासंदर्भात माहिती उपलब्ध नसल्याने देता येत नाही. |

Maharashtra University of Health Sciences Information Cell ★ Nashik ★

जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel : (0253) 2539152 / 6659152

Website : www.muhs.ac.in, E-mail : student_cell_academic@muhs.ac.in

MUHS

**डॉ. कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

**Dr. Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D. (Forensic Medicine)
**Registrar**


जा.क्र. मआविवि/विद्यार्थी कक्ष (शै.)/1996 /२०२०

**दि.२१/०९/२०२०**

परिपत्रक क्र. ०३/२०२०

तातडीचे ई-मेल तथा विद्यापीठ संकेतस्थळाद्वारे/ स्पीड पोस्ट

**प्रति,**
**अधिष्ठाता / प्राचार्य /संचालक,**
**विद्यापीठ संलग्नित सर्व पदवी महाविद्यालये / परिसंस्था**

**विषय : विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष उत्तीर्ण होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठ आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्र (University Internship Completion Certificate) वितरीत करण्याच्या सध्याच्या प्रचलित प्रक्रियेत बदल करणेबाबत...**

**संदर्भ** : दि.०३.०९.२०२० रोजी आयोजित विद्यापरिषदेतील सादर केलेल्या विषय क्र.६६/२०२० च्या अनुषंगाने पारित ठराव.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मला प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, दि.०३.०९.२०२० रोजी आयोजित विद्यापरिषदेने विषय क्र.६६/२०२० अंतर्गत आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्र (University Internship Completion Certificate) वितरीत करण्याच्या अनुषंगाने खालिल प्रमाणे एकमताने ठराव पारित केलेला आहे.

**ठराव क्र. ६६/२०२०**

"विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरावर निर्गमित करण्यात येत असलेले विद्यापीठ आंतरवासियता पुर्णत्व प्रमाणपत्र (University Internship Completion Certificate) वितरीत करणेच्या सध्याच्या प्रचलित प्रक्रियेत बदल करुन सदरचे प्रमाणपत्र महाविद्यालयांमार्फत महाविद्यालय स्तरावरच संबंधित केंद्रीयपरिषद तथा विद्यापीठाच्या नियमावलीनुसार सर्व कायदेशीर बाबी तपासुन निर्गमित करण्याबाबतच्या प्रणालीस सर्व उपस्थित सदस्यांमार्फत एकमताने मान्यता देण्यात आलेली आहे.

महाविद्यालयांमार्फत पात्र विद्यार्थ्यांच्या आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्र वितरीत करण्याची प्रक्रिया ०१ सप्टेंबर२०२० पासुन सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांचे आंतरवासियता प्रमाणपत्र वितरीत करण्यात यावे. तसेच आंतरवासियता प्रमाणपत्र वितरीत करण्याची नियमावली व आंतरवासियता प्रमाणपत्राचा नमुना विद्यापीठाने तयार करुन सर्व संलग्नीत महाविद्यालयांना कळविण्यात यावा."

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने आंतरवासियता प्रमाणपत्र निर्गमीत करण्याची संपूर्ण कार्यप्रणाली (परिशिष्ठ-अ, प्रमाणे) सर्व सलंग्नीत महाविद्यालयांनी महाविद्यालय स्तरावर करण्यास विद्यापरिषदेच्या उपरोक्त ठरावन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदर प्रमाणपत्र महाविद्यालयीन स्तरावर अधिष्ठाता / प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्यानिशी विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात वितरित करण्यात यावे. (परिशिष्ठ-ब प्रमाणे.)

Maharashtra University of Health Sciences, Nashik

कुलसचिव

सोबत :- वरील प्रमाणे



Scanned with CamScanner

परिशिष्ट-अ

"आंतरवासियता प्रमाणपत्र महाविद्यालयस्तरावर वितरीत करण्याची कार्यप्रणाली"

"आंतरवासियता प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविणे व प्रशासकीय प्रणाली अधिक सुलभ व विद्यार्थीकेंद्रीत करणेसाठी खालील नियमावली" नुसार कार्यवाही करण्यात यावी.

१) ०१ सप्टेंबर २०२० पासून आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्र महाविद्यालयीन स्तरावर अधिष्ठाता/प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिक्यानिशी विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात वितरित करण्यात यावे. विहीत नमुन्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

२) आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्याने संपूर्ण वर्षभरातील विविध विभागांचे उपस्थिती प्रमाणपत्र सादर केल्यानंतर १५ दिवसांच्या आत महाविद्यालयाने पात्र विद्यार्थ्यांना वितरित करावे.

३) विद्यार्थ्यास आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्र वितरित करतांना संबंधित विद्यार्थ्याची प्रवेश वैधता, मा. न्यायालयीन प्रकरण अथवा इतर शिस्तभंग प्रकरणे तपासण्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

४) आंतरवासियता प्रशिक्षण पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी ०१ महिन्याच्या आत महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करावी.

५) आंतरमहाविद्यालय,आंतरवासियता प्रशिक्षण बदलींची प्रकिया पूर्वीप्रमाणेच विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

६) संबंधित केंद्रिय परिषद व विद्यापीठाचे निर्देशानुसार आंतरवासियता प्रशिक्षणाचे नियोजन व मुल्यमापन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

७) सदर प्रमाणपत्राचे शुल्क विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केल्यानुसारच आकारण्यात यावे.

८) संबंधित केंद्रीय परिषदांनी विहीत केल्यानुसार आंतरवासियता प्रशिक्षण पुर्ण केलेल्या पात्र विद्यार्थ्यास आंतरवासियता पुर्णत्वाच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत वितरीत करणे, विद्यापीठाने विहित केल्याप्रमाणेच शुल्क आकारणी करणे, संबंधित विद्यार्थ्यांची प्रवेश वैधता तपासणे, मा. न्यायालयाचे अनुषंगिक निर्णय तपासणे वगैरे बाबींची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय / परिसंस्थेच्या अधिष्ठाता / प्राचार्य / संचालक यांची असेल.

९) सदरचे प्रमाणपत्र निर्गमित झाल्यानंतर त्याची एक प्रत संबंधित महाराष्ट्र परिषद व परिक्षा नियंत्रक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

१०) आंतरवासियता प्रशिक्षणसंदंर्भात तक्रारीचे निवारण विद्यापीठस्तरावर मा. कुलगुरुंचे निर्देशाप्रमाणे आंतरवासियता प्रशिक्षण तक्रार निवारण समीतीमार्फत करण्यात येईल.

११) याव्यतीरीक्त उक्त प्रकरणी नियम निर्धारीत करण्याचे, नियम रद्द किंवा नियमांत बदल करण्याचे अधिकार विद्यापीठास असतील.

कुलसचिव

Maharashtra University of Health Sciences Information Cell Nashik



Scanned with CamScanner

(3)

परिशिष्ठ-ब

महाविद्यालयस्तरावर आंतरवासियता प्रशिक्षण पुर्णत्व प्रमाणपत्राचा विहित नमुना

.......................................................................................................

*College Letter Head*

***Internship Completion Certificate***

This is to certify that Mr/Miss /Mrs................................. has passed the final year examination of .....................course conducted by the Maharashtra University of Health Sciences, Nashik held in Summer/Winter,20 . He / She is bonafide student of this College/Institute, having University Examination Permanent Registration Number............ and Provisional Registration Number..................... of State Council as..................

That Mr / Miss / Mrs ........................................ has satisfactorily completed Compulsory Rotatory Internship Training programme of......duration i.e. for.........days from date...../..../..... to date ..../..../.....as per the Central Council and University norms. During this period his / her clinical work and conduct was found satisfactory and there is no Legal or Admission Eligibility related matter is pending with the student and thus he/she found eligible for the award of ..............................................degree by the University.

Date:- / /20 .

Place:-

Maharashtra University of Health Sciences Information Cell ★ Nashik ★

**Name of HOD with sign**

**Name of Dean/Principal with sign**

*College Seal*

Scanned with CamScanner